# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
## वैद्यकिय आरोग्य विभाग
ईमेल आयडी- rchbnmc@gmail.com

## अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest)

१५ वा वित्त आयोग अंतर्गत, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकांतर्गत हेल्थ वेलनेस सेंटर उभारणे कामी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १० भाडयाच्या जागेची आवश्यकता असल्याने आरोग्य संस्था / इस्टेट एजन्सी / किंवा स्वता: यांचेमार्फत १० जागा भाडे तत्वावर घेण्यासाठी अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचा तपशील | करार कालावधी |
|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग अंतर्गत, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकांतर्गत हेल्थ वेलनेस सेंटर उभारणेकामी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १० जागा भाडेतत्वार आवश्यकता असल्याने आरोग्य संस्था / इस्टेट एजन्सी/ किंवा स्वत: यांचेमार्फत १० भाडयाच्या जागेचे अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविण्यात येत आहे | ३ वर्षे |
| २ | अभिव्यक्ती स्वारस्य सादर करण्याची अंतीम तारीख | २१-०७-२०२२ |
| ३ | अभिव्यक्ती स्वारस्य उघडण्याची तारीख | २८-०७-२०२२ |

अधिक माहिती भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या www.bncmc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

XXX
वैदयकीय आरोग्य अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

दिनांकः-       /       /२०२२

प्रति,
मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

मी श्री. श्रीम. ------------------------------------------ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने काढलेल्या स्वारस्य अभिरुचीच्या अनुषंगाने अर्ज करते / करतो की ------------------------------------------------------------------------------ येथे माझे ताब्यातील जागा महापालिकेच्या आरोग्य विभागास Health and Wellness Centre करीता भाडे तत्वावर देणेकरीता इच्छुक आहे. त्याकरीता महापालिकेचे R.R दरानुसार निर्धारीत केलेले भाडे मला मान्य आहे.

१ जागेचे नाव -

२ बिल्डींग / घराचे नाव -

३ एकूण चटई क्षेत्र -

४ Tax पावती -

५ पाणी बिल पावती -

६ स्वतंत्र विद्युत बील -

७ सदरच्या जागेपासून झोपडपट्टी /चाळ परिसराचे अंतर -

८ करार नोंदणी पावती (Agreement Registration) -

९ इमारतीचे वय -

आपण नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची प्रत सोबत जोडली आहे.

आपली/आपला नम्र,

(                    )

# करारनामा

सदरहू करारनामा आज दिनांक- / /२०२२ रोजी भिवंडी येथे प्रथम व द्वीतीय पक्षात होत आहे.

--------------------------------------------------

--------------------------------------------------

प्रथम पक्षकार / मिळकत मालक

आणि

वैद्यकीय आरोग्य अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

द्वितीय पक्षकार / भाडेकरू

**प्रास्ताविक :-**

------------------------------ (जागेचा संपूर्ण पत्ता) सदरहू जागा ( क्षेत्रफळ ) माइया /संस्थेच्या ताब्यात असून मला हि जागा भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील Health Wellness Centre करीता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागा मार्फत रेडी रेकनर च्या दरा नुसार भाडेतत्वावर देण्यास तयार आहे

**करारनाम्याच्या सर्व अटी व शर्ती दोन्ही पक्षकारास मंजूर आहे.**

**अटी / शर्ती :-**

१) प्रस्तावीत जगा हो किमान ----------------------- स्के. फूट चटई क्षेत्र (Usable Carpet Area) स्वतंत्र स्वच्छतागृह सुविधेसह आहे
२) सदर जागा ही शासन मंजूर कार्यक्षेत्रांतर्गत आहे.
३) सदर जागेसाठी महापालिकेच्या नगररचना विभागामार्फत प्रमाणीत केल्यानुसार रेडी रेकनर दराप्रमाणे दरमहा भाडे रुपये ----------------------- अदा करण्यात येईल.
४) सदर जागेचे विज बिल,पाणी बिल तसेच मालमत्ता कर भरणा करण्याची जबाबदारी जागा मालकाची असेल याचबरोबर सदर जागेकरीता स्वतंत्र वीज जोडणी, पाणी जोडणी करून देण्याची जबाबदारी ही जागा मालकाची असेल .

५) प्रस्तावीत आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता खालीलप्रमाणे विभाग असणे गरजेचे आहे. याकरीता सदर जागेमध्ये प्रस्तावीत आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता आवश्यक दुरुस्ती व बांधकाम करण्याची जबाबदारी जागा मालकाची असेल.

अ. नोंदणी विभाग (Registration area)

ब. प्रतिक्षा विभाग (Waiting area)

क. बाहयरूग्ण विभाग (OPD. room)

ड. औषध वितरण विभाग (Pharmacy)

इ. इंजेक्शन/ उपचार विभाग (injection/ Treatment room)

ई. समुपदेशन विभाग (Counseling room)

फ. वेलनेस रूम (Welness room)

ग. स्वच्छतागृह (Separate Toilet))

६) सदर आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये अपंग वृद्ध व्यक्तींकरीता सेवा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याने त्यादृष्टीने सदर जागा सोयीस्कर असणे गरजेचे आहे. (तळमजल्यावर Ramp असणे आवश्यक आहे)

७) सदर जागा हो अधिकृत इमारतीमध्ये अथवा अधिकृत जागेमध्ये आहे. तसेच संबंधीत सोसायटीकडील सदर जागा भाडयाने देणेबाबत हरकत नसलेबाबतचा "ना हरकत दाखला जोडलेला आहे. आणि सदर जागेस स्वतंत्र प्रवेश आहे.

८) सदर जागेकरीता किमान दि.-------------------- ते दि. --------------------------- वर्षाचा करारनामा करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये भाडयामध्ये कोणत्याही प्रकारे वाढ करता येणार नाही.

९) मुदतीपूर्वी फरारनामा संपुष्टात आणावयाचा असल्यास संबंधीतांनी किमान ०३ महिने आगाऊ नोटीस देणे गरजेचे आहे.

१०) सदर जागेचा बांधकाम आराखडा महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत मंजूर करण्यात आलेला आहे.

११) सदर जागेमध्ये किमान १००० लि. क्षमतेची स्वतंत्र पाण्याची टाकी बसवून देण्यात आलेली आहे.

१२) सदर प्रकरणी भविष्यात कोणत्याही प्रकारचा वाद उदभवल्यास याबाबत मा. आयुक्त से., भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी याचे निर्णय अंतिम राहतील.

१३) करारनामाच्या कालावधीची मुदत दि.--------------------- पर्यंत पुर्ण झाल्यानंतर द्वितीय पक्षकारास इमारतीस सुशोभिकरणासाठी केलेला व इतर केलेला खर्च मागता येणार नाही.

१४) सदरहू इमारतीची करार कालावधीत कोणत्याही प्रकारे विक्री व्यवहार द्वितीय पक्षकारास करता येणार नाही व कोणताही भाग
अथवा संपूर्ण इमारत गहाण ठेवता येणार नाही.

१५) सदर इमारतीच्या बांधकामाच्या (स्ट्रक्चरल डिझाईन) आर.सी. सी. च्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

१६) द्वितीय पक्षकारास नियमीत कालावधीने मालमत्तेची रंगरंगोटी, डागडुजी इ. दुरुस्तीची कामे स्वखर्चाने करावी लागतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे विचारार्थ घेतली जाणार नाही किंवा कोणत्याही प्रकारची प्रतीपूर्ती मनपातर्फे केली जाणार नाही.

१७) द्वितीय पक्षकारास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिम किंवा आमलात असलेले अधिनियिमातील तरतुदीनुसार इमारतीकरीता वेळोवेळी जे शासकीय कर महापालिका लागू करील ते सर्व शासकिय व इतर लागू असलेले कर विहीत मुदतीत भरणे बंधनकारक राहील.

१८) उपरोक्त अटी - शर्तीचा भंग केल्यास सदर करारनामा रद्द करण्याचा एकतर्फी अधिकार मनपा स्वत: कडे राखून ठेवत आहे. याबाबतची कोणतीही तक्रार अथवा विनंती मान्य करता येणार नाही व त्याबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही.

----------------------------------------- -
----------------------------------------- -

वैद्यकीय आरोग्य अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

----------------------------------------

प्रथम पक्षकार / मिळकत मालक

साक्षीदार

१.---------------------------------

२.---------------------------------

व्दितीय पक्षकार भाडेकरू

साक्षीदार

१.---------------------------------

२.---------------------------------

दिनांक:- / /२०२२

- **प्रस्तावना -**

१५ वा वित्त आयोग अंतर्गत प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य संस्थांना सक्षम करण्यासाठी सन २०२२ ते २०२६ या ५ वर्षांच्या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार असून या आयोगा अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत शहरी व ग्रामिण भागातील आरोग्य सेवांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१५ वा वित्त आयोगा अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता एकूण १० आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आलेले असून सदर ठिकाणी डॉक्टर्स, कर्मचारी यांचे वेतन, औषधे, इमारती दुरुस्ती इ. प्रकारचे १०० टक्के अनुदान शासनामार्फत उपलब्ध होणार असून याकरीता महानगरलिकेच्या मालकीची अथवा भाड्याची किमान ५०० स्के.फुट जागा उपलब्ध असणे गरजेचे आहे.

त्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी जवळपास असणा-या एकूण १० जागां करीता मनपा किंवा शासकिय इमारती उपलब्ध असल्यास त्याठिकाणी आरोग्य वर्धिनी केंद्र (HWC) कार्यान्वीत करणे आहे. मनपाची किंवा शासकिय जागा उपलब्ध नसल्यास भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घ्यावी अशा शासनाच्या सुचना आहेत. सदर जागेचे भाडे महापालिकेच्या नगररचना विभागामार्फत रेडी रेकनर दरानुसार प्रमाणित केल्यानंतरच देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

- **कामाचे स्वरुप (HWC चे काम ) :-**

१५ वा वित्त आयोगांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता एकूण १० आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आलेले असून सदर ठिकाणी डॉक्टर्स, कर्मचारी यांचे कडून बाह्य रुग्ण तपासणी, लहान मुलाचे लसीकरण, गरोदर मातांची तपासणी, संसर्गजन्य, असंसर्गजन्य रोगाचे सर्वेक्षण, बाहय शिबीरांचे आयोजन करणे, आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये अपंग, वृध्द व्यक्तींकरीताही सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जागा कोणत्या क्षेत्रामध्ये आवश्यक आहे त्याची यादी जोडली आहे. (Ann १) आवश्यकता भासल्यास जागांची संख्या कमी जास्त होऊ शकते.

- **महानगरपालिकेची जबाबदारी :-**

या आयोगांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता एकूण १० आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आलेले असून सदर ठिकाणी डॉक्टर्स, कर्मचारी यांची नेमणूक शासन स्तरावरुन (जिल्हा स्तरावरुन) होणार आहेत. औषधे देखिल शासन स्तरावरुन (जिल्हा स्तरावरुन) उपलब्ध होणार आहेत. तसेच फर्निचर व Telecommunication साहित्य, इमारती भाडे, कर्मचा-यांचे वेतन अनुदान मनपास उपलब्ध होणार आहे. तरी सदर कर्मचारी वेतन, इमारत भाडे अदा करणेची जबाबदारी तसेच कार्यक्रम राबविणे व HWC संनियंत्रण करणेची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

- **मालकाची / संस्थेची जबाबदारी :-**

१) प्रस्तावीत जागा ही किमान ५०० स्के. फुट चटई क्षेत्र (Usable Carpet Area) स्वतंत्र स्वच्छतागृह सुविधेसह असणे गरजेचे आहे.

२) सदर जागा ही झोपडपट्टी परिसरात अथवा परिसरालगत असणे आवश्यक आहे.

३) सदर जागेकरीता महानगरपालिकेमार्फत कोणत्याही प्रकारची अनामत रक्कम (Deposit) अदा

करण्यात येणार नाही.

४) सदर जागेचे विज बिल, पाणी बिल तसेच मालमत्ता कर भरणा करण्याची जबाबदारी जागा मालकाची असेल याचबरोबर सदर जागेकरीता स्वतंत्र वीज जोडणी, पाणी जोडणी करून देण्याची जबाबदारी ही जागा मालकाची असेल.

५) प्रस्तावात आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता खालीलप्रमाणे विभाग असणे गरजेचे आहे. याकरीता सदर जागेमध्ये प्रस्तावीत आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता आवश्यक दुरूस्ती व बांधकाम करण्याची जबाबदारी जागा मालकाची असेल.

६) रिपेअर्स, रिनोव्हेशन करणेची जबाबदारी संपूर्णपणे जागा मालकाची असेल. याकरीता मनपा कोणत्याही प्रकारे प्रतीपुर्ती किंवा देयक अदा करणार नाही.

आ. नोदणी विभाग (Registration area)
भ. प्रतिक्षा विभाग (Waiting arca)
ख. बाह्यरुग्ण विभाग (OPD Room)
ड. औषध वितरण विभाग (Pharmacy)
इ. इंजेक्शन/ उपचार विभाग (Injection / T-reatment room).
ई. समुपदेशन विभाग (Counselling room)
फ. वेलनेस रूम (Wellness room)
ग. स्वच्छतागृह (Separate Toilet).

- **कालावधी :-**

सदर जागेकरीता किमान ०३ वर्षाचा करारनामा करण्यात येईल. सदर कालावधीमध्ये भाड्यामध्ये कोणत्याही प्रकारे वाढ करता येणार नाही. तद्नंतर प्रती वर्षी दरमहा भाडयामध्ये ०५ टक्के वाढ करण्यात येईल

- **पेमेंट अटी व शर्ती :-**

सदर जागेसाठी महापालिकेच्या नगररचना विभागामार्फत प्रमाणीत केल्यानुसार रेडी रेकनर दराप्रमाणे दरमहा भाडे अदा करण्यात येईल.

- **पात्रतेचे निकष :-**

१. आरोग्य संस्था/ इस्टेट एजन्सी / स्वत:
२. आरोग्य संस्था अथवा इस्टेट एजन्सी यांचे नोंदणी प्रमाण पत्र
३. इस्टेट एजन्सी/आरोग्य संस्था GST प्रमाणपत्र

- **करारनाम्याचा मसुदा :-**

संस्था असल्यास संस्थाने जागा मालकासोबत करार करावा ( लिव आणि लायसन करारनामा) संस्थेसोबत महानगरपालिका EOI साठी करार करेल करारनाम्याचा मसुदा (Ann II)

१४) एकाच परिसरातून दोन किंवा अधिक जागेकरीता प्रस्ताव प्राप्त झाल्यास महापालिकेची तांत्रिक समितीच्या निर्णयानुसार जागा निश्चीत करण्यात येईल.

**तांत्रिक समितीमध्ये खालीलप्रमाणे समिती सदस्य असतील -**

२) मा. उप-आयुक्त सो., (आरोग्य प्रशासन)
ब) मा. वैद्यकियआरोग्य अधिकारी
ख) मा. नोडल ऑफिसर
ड) शहर कार्यक्रम व्यवस्थापक

**सदर समितीमार्फत खालील निकषांवर आधारीत निर्णय घेण्यात येईल :-**

- इमारतीचे वय
- झोपडपट्टी / चाळ परिसरापासूनचे अंतर
- इमारतीची स्थापत्याबाबतची स्थिती
- सदर जागा इमारतीच्या कितव्या मजल्यावर आहे.
- जागेचे चटई क्षेत्र
- पार्किंग सुविधा

१५) इस्टेट एजन्सी वा नोंदणीकृत हेल्थ केअर एजन्सी यानी सुचविलेल्या जागांकरीता संबंधीत जागा मालकाकडून शुल्क आकारावे. महापालिकेमार्फत कोणत्याही प्रकारचे शुल्क इस्टेट एजन्सी वा नोंदणीकृत हेल्थ केअर एजन्सी यांना देण्यात येणार नाही.

१६) या कार्यवाही बाबत फेरबदलाचे सर्व अधिकार शासनाच्या नियमित सुचनांनुसार मा. आयुक्त तथा प्रशासक (अध्यक्ष), वैद्यकिय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव यांचेकडे राखिव ठेवण्यात आले आहे.

यानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १५ वित्त आयोग अंमलबजावणी अंतर्गत भिवंडी महानगरपालिका करीता हेल्थ अँन्ड वेलनेस सेंटर उभारणे कामी कार्यक्षेत्रातील निश्चित करण्यात आलेल्या जागा खालीलप्रमाणे —

१ - नेहरुनगर, शितलादेवी मंदीर जवळ, KGN चौक, कनिष्ठ महाविद्यालय
२ - पिराणीपाडा, गोविंद नगर, सुभाष टेकडी, पोलीस स्टेशन जवळ, शांतीनगर
३ - वंजारपट्टी नाका, अमिना बाग, फरीदा बाग जवळ, मिल्लतनगर
४ - चाविंद्रा
५ - नुरी नगर
६ - सलामतपुरा
७ - पटेल कंम्पाऊंड
८ - कल्याण रोड, साईबाबा मंदीर
९ - टेमघर
१० - हालिमनगर

वरील नमुद कार्यक्षेत्र अंतर्गत प्रत्येकी १ याप्रमाणे १० जागा भाडे तत्वावर उपलब्ध होणे कामी "अभिव्यक्ती स्वारस्य" (Expression of Interest) प्रसिद्ध करणेत आली आहे.

XXX
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी